**माहे ऑगस्ट २०२१ महाचा मासिक अहवाल**

**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**

| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | गोंदीया | टायसन बेल्जीयम मेलॉनॉईज | १) पोशि /२०२८ राजु कोसरे<br>२) पोशि /२०२४ रविकुमार माने | चिंचवड पो. स्टे. गु. र. नं. ८५/२०२१ कलम ३, २५, २६ भा. ह. का व १८, २०, २३ बेकायदा कृत्य अधिनियम १९६७ हा गुन्हा दि. १९/८/२०२१ रोजी १९:४७ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील आरोपी घनश्याम शिवलाल आचले याने भारत सरकारविरूध्द हल्ला व घातपात करण्याच्या उद्देशाने एके ४७ रायफल चे ५२ नग काडतुस आपल्या शेतात लपवुन ठेवल्याच्या गोपनीय माहितीवरून घटना ठिकाणी सर्च करण्याचा आदेश झाल्याने श्वान हस्तकांनी श्वान टायसन याचे सहाय्याने जागेची पाहणी केली असता सदर ठिकाणी श्वान टायसन याने वास घेवुन भुंकून स्फोटके असल्याचे दर्शवीले. मा.वरीष्ठांच्या आदेशान्वये एस. ओ. पी. चे पालन व सुरक्षितरीत्या हुक ॲन्ड सेडचा वापर करून रिमोटली सदर स्फोटके काढण्यात आले. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | अकोला | लुसी जर्मन शेफर्ड | १) पोना/१९२६ गोपाल श्रीराम चव्हाण<br>२) पोकॉं/२४७५ गणेश रमेश महाले | जुने शहर पोलीस स्टेशन गु. र. नं. ८२७/२०२१ कलम २० (बी) (ii) NDPS act 1985 हा गुन्हा दि. २५/८/२०२१ रोजी दाखल असून सदर गुन्हयातील आरोपी गणपत राधाकिशन कनोजिया याचे घराची घरझडती करीता श्वान लुसी हीला घरात सोडले असता तीने घरातील कुलर व इतर वस्तु चेक करत करत किचन ओटयाजवळ जावुन वास घेतला असता किचन ओटयाखाली असलेल्या एक स्टीलची किटली व प्लॅस्टीक डब्याजवळ जावुन वारंवार वास घेवुन पाय मारून इशारा दिल्याने सदर डब्बा व किटलीची पाहणी केली असता त्यामध्ये पाने, फुले, काडया बीया असलेला उग्रट वासाचा गांजा मिळुन आला. त्याचे वजन ९४६ ग्रॅम एवढे भरले असुन किंमत अंदाजे १०५००/- एवढी आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | अकोला | लुसी<br>जर्मन शेफर्ड | १) पोना/१९२६ गोपाल श्रीराम चव्हाण<br>२) पोकाँ/२४७५ गणेश रमेश महाले | अकोट फैल पोलीस स्टेशन गु.र.नं. ७६८/२०२१ कलम २० (बी) (ii) NDPS act 1985 हा गुन्हा दि.२६/८/२०२१ रोजी दाखल असून सदर गुन्हयातील आरोपी उमेश सिताराम हिवराळे याचे घराची घरझडती करीता श्वान लुसी हीला घरात सोडले असता तीने घरात प्रवेश करून इतरत्र शोध घेत घेत कुलरचे मागील भींतीस लावुन ठेवलेल्या प्लॅस्टीकचे पिशवीचा वास घेवुन भुंकली असता सदर प्लॅस्टीक पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये पाने, फुले, काडया बीया असलेला उग्रट वासाचा गांजा मिळुन आला. त्याचे वजन ५४५ ग्रॅम एवढे भरले असुन किंमत अंदाजे ५५००/- एवढी आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४ | रत्नागिरी | व्हिक्टर जर्मन शेफर्ड | १) पोहवा/१२६३ एस.एस.भोळे<br>२) पोना/१२४७ एन.एच.पाचवे | रत्नागिरी शहर पो.स्टे. गु.र.नं. ४१०/२०२१ एनडीपीएस कायदा १९८५ चे कलम ८ (क), २० हा गुन्हा दि.१०/८/२०२१ रोजी १४:२० वाजता दाखल असून सदर गुन्हयातील तपासी अंमलदार यांचे आदेशाप्रमाणे संशयीत इसम नामे सलमान नाजिक पावसकर याची झडती घेण्यास सांगीतली त्यानुसार श्वान व्हिक्टरने सदरचे इसमाचा वास घेत त्याचे हातातील काळया रंगाचे प्लॅस्टीक पिशवीचा वास घेतला असता श्वानाने अक्रामक होवुन व भुंकून पिशवीस चावा घेवुन इशारा दिला संशयीत इसमाचे हातातील काळया रंगाचे प्लॅस्टीक पिशवीतील मिळुन आलेल्या पदार्थाची फॉरेन्सीक तज्ञांनी तपासणी केली असता त्यामध्ये गांजा हा अंमली पदार्थ आढळुन आलेला आहे. त्याचे वजन ०.४१४ ग्रॅम भरले आहे. |




**अशा प्रकारे माहे ऑगस्ट २०२१ मध्ये भारतीय हत्यार कायदा - ०१, एनडीपीएस कायदा - ०३ असे एकुण ०४ गुन्हे श्वान पथकामार्फत उघडकीस आलेले आहेत.**